दिनांक 25 /07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.53

विषय:- नगरपरिषद कामकाजकामी सन 2022- 2023 साठी चार्टड अकौंटन्ट ए.डी. शिकलगार आणि कंपनी यांचे दिनांक 07/07/2023 रोजीचे पत्रावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा. मुख्याधिकारी यांनी लेखापाल यांची दि. 24/07/2023 रोजी मंजुर केलेली टिपणी

नगरपरिषद कामकाजकामी सन 2023-2024 साठी चार्टड अकौंटन्ट ए.डी. शिकलगार आणि कंपनी यांनी दिनांक 07/07/2023 रोजीचे पत्राने विनंती केली आहे. नगरपरिषेदेकडील ठेकेदारांचे जीएसटी टिडीएस भरणा करणे, लेख्यांच्या डबल ऐंन्ट्रीची नोंद करणे तसेच नगरपरिषद कर्मचारी यांचे आयकर भरणे इत्यादी कामकाजासाठी नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्रं. 33 दिनांक 13/09/2022 ने चार्टड अकौंटन्ट ए.डी. शिकलगार आणि कंपनी यांना सन 2022-2023 या वर्षासाठी मुदतवाढ देणेत आली होती. त्यानुसार सन 2023-2024 या वित्तीय वर्षासाठी सन 2022- 2023 च्या दराप्रमाणेच ते काम करणेस तयार असलेने त्यांना सन 2023-2024 सालासाठी मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
(डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 25/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.54

विषय:- नगरपरिषद हद्दीतील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामांची निवड करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1)मा. मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दि. 24/07/2023 रोजी मंजुर केलेली टिपणी
2) शासन निर्णय क्र.विघयो-102000/1592/प्र.क्र.189/10//नवि-4 दि.05/03/2002
3) मा.जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2023-2024 करिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यय पत्र क्र.नवि/कार्या-2/कावि-211/2023 दि.17/05/2023

संदर्भ क्र.2 नुसार विटा नगरपरिषद हद्दीतील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून रक्कम रुपये 1,45,88,646/- इतके अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. संदर्भ क्र. 2 नुसार प्र.जिल्हा सह आयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी दि.17/05/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणे असे सांगितले आहे.

तरी सदर प्रस्ताव सादर करणेकरीता खालील कामे प्रस्तावित करणेत येत आहेत.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील जोतीबानगर येथे दत्तगुरु कांबळे घर ते भूपेश कांबळे घरापर्यंतचा रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 9) (अंदाजित रक्कम रुपये 44,72,861/-)
2. विटा नगरपरिषद हद्दीतील सोनारगल्ली येथे वरुडे घर ते विठ्ठल महाजन घरापर्यंतचा रस्ता ट्रिमिक्स कॉंक्रिटीकरण करणे. (प्रभाग क्र. 11) (अंदाजित रक्कम रुपये 5,69,014/-)
3. विटा नगरपरिषद हद्दीतील जोतिबानगर येथे गजानन कांबळे घर ते रुपेश कांबळे प्लॉट पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 9) (अंदाजित रक्कम रुपये 44,72,861/-)
4. विटा नगरपरिषद हद्दीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर येथे विविध ठिकाणी रस्ते ट्रीमिक्स कॉंक्रिटीकरण करणे व आर.सी.सी. गटर करणे. (प्रभाग क्र. 11) (अंदाजित रक्कम रुपये 40,35,884/-)

पान नं.2 वर

5. विटा नगरपरिषद हद्दीतील तासगांव रोड शिवसंगम मार्ग, फुलेनगर शाळा नं. 6 ते श्रीनगर तलाव पर्यंत विद्युत पोल उभे करणे. (प्रभाग क्र. 11) (अंदाजित रक्कम रुपये 30,94,426/-)
6. विटा नगरपरिषद हद्दीतील तासगांव रोड आंबेडकरनगर कॉर्नर येथे मिनी हायमास्ट उभा करणे. (प्रभाग क्र. 11) (अंदाजित रक्कम रुपये 1,08,227/-)

उपरोक्त काम क्र. 1 ते 5 यांस मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व काम क्र. 6 यांस विद्युत अभियंता विटा नगरपरिषद यांचेकडून तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे.वरील कामे ही या अगोदर सर्वसाधारण सभेसमोर घेवून सदर कामांना सन 2022-2023 मधून ठरावाची मंजूरी घेणेत आलेली होती. परंतु सन 2022-2023 चे नियतव्ययातून निधी कमी असलेने सदर कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली नाही. तरी सदर कामांना सन 2023-2024 करिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत करणेस मंजूरी देत आहे. सदर कामी मा.जिल्हाधिकारीसो यांची प्रशासकीय मान्यता घेणेत यावी. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
(डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 25/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 55

विषय- विटा नगरपरिषदेकडील क्रिकेट व कब्बडी खेळाडूनां ( ट्रॅक सुट,शॉर्ट, टी शर्ट, 2 बॅट, 12 बॉल, 6 स्टम्प, 2 गार्ड ) इत्यादी साहित्य 35 खेळाडू करीता नगरपरिषेदेच्या नावासह पुरवठा करणेकामी खालील दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा. मुख्याधिकारी यानी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 18/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील क्रिकेट व कब्बडी खेळाडूनां ( ट्रॅक सुट,शॉर्ट, टी शर्ट, 2 बॅट, 12 बॉल, 6 स्टम्प, 2 गार्ड ) इत्यादी साहित्य 35 खेळाडू करीता नगरपरिषेदेच्या नावासह पुरवठा करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

1) मॅजिक स्पोर्टस, विटा
2) श्रीप्रसाद स्पोर्टस, विटा
3) शिंदे स्पोर्टस, विटा

उपरोक्त निविदापैकी श्रीप्रसाद स्पोर्टस, विटा यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
(डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 25 /07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 56

विषय- विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अंतर्गत शौचालय बसविणेकामी खालील निविदावर निर्णय घेणे

संदर्भ- मा. मुख्याधिकारी यानी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 18/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अंतर्गत शौचालय बसविणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन्स, विटा | प्रति नग रक्कम रू. 8,90,000/- |
| 2) मलिक इलेक्ट्रीकल्स, विटा | प्रति नग रक्कम रू. 9,96,000/- |
| 3) फोकस सिस्टीम, विटा | प्रति नग रक्कम रू. 9,98,000/- |

उपरोक्त निविदापैकी आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन्स, विटा यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
(डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा